# प्रेस नोट

**परीमंडळ २ पुणे शहर विभागातील भारतीविद्यापीठ पोलीस ठाण्याचे हद्दीतील सराईत गुन्हेगार टोळीतील ०२ गुन्हेगार इसमांना पुणे शहर,पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे व पुणे जिल्हयाचे हददीतून दोन वर्षासाठी हद्दपार केलेबाबत**

दिनांक :- २५/०३/२०१९

भारतीविद्यापीठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार टोळीतील इसम नामे (१) किशोर शंकर मोरे वय २६ वर्षे रा.४१९/३० डायसप्लॉट, कॅनॉल लगत, गुलटेकडी, पुणे (टोळी प्रमुख) (२) आकाश गोविंद गायकवाड वय-२० वर्षे रा.गोलघर नं.६९, पी पर्वती दर्शन, बालवीर मंडळा शेजारी, पुणे (टोळी सदस्य) यांना महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ प्रमाणे पोलीस उप आयुक्त परीमंडळ-२, पुणे शहर यांचेकडील तडीपार आदेश १०/२०१९ दिनांक २५/०३/२०१९ रोजी दोन वर्षाकरीता पुणे शहर, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे परिक्षेत्र व पुणे जिल्ह्याच्या हद्दीतून हद्दपार करण्यात आले आहे. सदर इसमांविरुध्द ते एकत्रित व वैयक्तिक गुन्हे करत होते. त्यांचे विरुध्द हाताने मारहाण करुन धमकी देणे, इतरांचे जिवीत किंवा व्यक्तिगत सुरक्षितता धोक्यात आणणा-या कृतीने दुखापत करणे, सामाईक इरादा, जबरीचोरी, प्रतिबंधक आदेशाचा भंग करणे, चोरी करणे, यासारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे भारतीविद्यापीठ, दत्तवाडी, सहकारनगर पोलीस ठाणे येथे दाखल असून टोळी प्रमुख (१) किशोर शंकर मोरे वय २६ वर्षे रा.४१९/३० डायसप्लॉट, कॅनॉल लगत, गुलटेकडी पुणे (टोळी प्रमुख) व (२) आकाश गोविंद गायकवाड वय-२० वर्षे रा.गोलघर नं.६९, पी पर्वती दर्शन, बालवीर मंडळा शेजारी, पुणे (टोळी सदस्य) यांची सदर भागात दहशत असल्याने त्यांना **बच्चन सिंह पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, पुणे शहर** यांनी पुणे शहर, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रातून व पुणे जिल्ह्याच्या हद्दीतून दोन वर्षाकरीता तडीपार केले आहे.

नागरीकांना तडीपार इसम दिसून आल्यास नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

**(बच्चन सिंह)**
पोलीस उप आयुक्त,परि. २
पुणे शहर.